# आशा फाउंडेशनचा 'हर घर तिरंगा' अभियानात सहभाग

▮ **पुणे** : भारतीय स्वातंत्र्याच्या अमृत महोत्सवांतर्गत 'हर घर तिरंगा' अभियान राबविण्यात येत आहे. इंडिया आशा फौंडेशनतर्फे या अभियानात वेगळ्याप्रकारे सहभागी होण्यासाठी भारतीय जवानांवर आधारित एक देशभक्तीपर गीत तयार केले आहे. मी एक निनावी मावळा हे गीत आज शनिवारी (दि.१३ ऑगस्ट) प्रसारित करण्यात येणार आहे. हर घर तिरंगा अभियानांतर्गत एक आठवड्यात दहा दशलक्ष नागरिकांनी हे गीत ऐकावे, पाहावे, असे उद्दिष्ट संस्थेने डोळ्यासमोर ठेवले आहे. त्यासाठी प्रत्येक भारतीयाने आपले कुटुंबीय, नातेवाईक व परिचित अशा किमान १० सदस्यांपर्यंत मावळा गीत पोहोचवावे, असे आवाहन इंडिया आशा फौंडेशनतर्फे करण्यात येत आहे. गायिका व संगीतकार हिमांगी विश्वरूप यांनी या गाण्याला साज चढविला आहे.